# शिवाजी विद्यापीठ,
## कोल्हापूर, महाराष्ट्र

# दूर शिक्षण केंद्र



**एम. ए. भाग- २ : समाजशास्त्र**

सत्र-४ : पेपर क्रमांक : SOC 007

# समाजशास्त्रीय सिद्धांतातील सद्यकालीन प्रवाह

(शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून)

Scanned with CamScanner

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

**एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र**

**सत्र–४ : पेपर क्रमांक SOC 007**

# समाजशास्त्रीय सिद्धांतातील सद्यकालीन प्रवाह

**(Recent Trends in Sociological Theory)**

(शैक्षणिक वर्ष २०१४–१५ पासून)

Scanned with CamScanner

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर



## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–४ घटक क्रमांक |
|---|---|
| प्रा. राजेंद्र पुंडलीक पवार<br>वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड | १ |
| प्रा. पी. एस. साळुंखे<br>के. बी. पी. कॉलेज, उरुण–इस्लामपूर | २, ३ |
| प्रा. सी. आर. खंडागळे<br>कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली | ४ |

■ संपादक ■

प्रा. पी. एस. साळुंखे
के. बी. पी. कॉलेज, उरुण–इस्लामपूर

Scanned with CamScanner

# सत्र ४ : घटक १

## नवप्रकार्यवाद आणि नवमार्क्सवाद

## Neo Functionalism and Neo Marxism

घटक संरचना :

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ नव प्रकार्यवाद : जेफ्री सी. अलेक्झांडर

हेगेलीयन मार्क्सवादी : जार्ज लुकास व अंटोनो ग्रामसी

टिकात्मक / मूल्यमापनात्मक सिध्दांत

जर्गन हेबरमास यांचे योगदान

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक संज्ञा

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

४.६ स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

अ. Neo functionalism: Jeffery. C. Alexander

नव- प्रकार्यवाद : - जेफ्री सी. अलेक्झेंडर

ब. Hegelian Marxism: Georg Lukacs, Antonio Gramsci

हेगेलीयन मार्क्सवादी: जार्ज लुकास व अंटीना ग्रामसी

क. Critical Theory:

टिकात्मक / मुल्यमापनात्मक सिध्दांत

ड. Contribution of Jurgen Habermas

जर्गन हेबरमास यांचे योगदान



Scanned with CamScanner

# नवप्रकार्यवाद आणि नवमार्क्सवाद : NEO FUNCTIONALISM AND NEO MARXISM

## १.१ उदिदष्ये (Specific Objectives)

प्रस्तुत अभ्यासात पूढील उदिदष्टये निश्चित केली आहेत

१. समाजशास्त्रातील नव विचारप्रवाह अथवा सिध्दांताची विदयार्थ्यांना माहिती करुन देणे विशेष: नवप्रकार्यवाद आणि नवमार्क्सवाद

२. नवप्रकार्यवाद आणि नवमार्क्सवादावरील समिक्षणात्मक सिध्दांताची विदयार्थ्यांना ओळख करुन देणे.

३. नवप्रकार्यवाद आणि नवमार्क्सवादावर विद्यार्थ्यांच्या विश्लेषणात्मक कौशल्याचा विकास करणे.

## १.२ प्रस्तावना : INTRODUCTION

समाजशास्त्रीय विश्वामध्ये प्रकार्यवादी व मार्क्सवादी सिध्दांताना विशेष महत्वाचे स्थान आहे. इतकेच नसून आजपर्यंतच्या सर्व समाजशास्त्रीय विचार आणि सिध्दांतांचा मुळ पाया प्रकार्यवाद आणि मार्क्सवाद यावरच आधारीत आहे. मार्क्सवादावरच आधारीत आहे. मार्क्स प्रकार्यवादाचा सैध्दांतिक पाया व्यवस्थेच्या तत्वावर (Social order) आधारीत आहे तर मार्क्सवादाचा समाजशास्त्रीय विश्लेषणाचा भर व्यवस्थेचा तत्वातीक विरोध संघर्ष, तणाव व शोषण हा राहीला आहे. हे दोन्ही सिध्दांत समाजशास्त्रीय बौध्दिकतेची परस्परविरोधी दोन टोके असून एक परिवर्तनापेक्षा व्यवस्थेला महत्व देतो तर दुसरा परिवर्तन विषेशता क्रांतिकारी परिवर्तनाला महत्व देतो.

आपण प्रस्तुत विषयात नवप्रकार्यवादी व नवमार्क्सवादी विचारप्रवाहाचा अभ्यास करणार आहोत. प्रकार्यवाद आणि मार्क्सवादी सिध्दांत हे समाजशास्त्रीय विश्वातील लोकप्रिय सिध्दांत आहेत. आज अधुनिक समाजशास्त्रामध्ये सैध्दांतिक परिवर्तनाचे जे आव्हान निर्माण झाले त्याचा एक प्रभावी परिणाम म्हणून नवप्रकार्यवाद व नव मार्क्सवादाकडे पाहावे लागले. १९९० मध्ये रशियाचे विघटन झाल्याने मार्क्सवाद दुर्बल व अशक्त झाला. परंतु उत्तर आधुनिक सिध्दांताचे नव्याने विशलेषण सुरू केले. नवप्रकार्यवादी सिंध्दात टॉलकॉट पारसनच्या नव्या संदर्भाचा शोध घेतात. म्हणजेच परंपरागत प्रकार्यवादाला नव्या रुपात मांडायचा प्रयत्न करतात. नवप्रकार्यवादाची सुरवात व शेवट टॉलकॉट पार्सन्सवरच होतो. नव प्रकार्यवाद म्हणजे जुनी दारू नवीन बाटली होय.

नवप्रकार्यवादाप्रमाणे नवमार्क्सवाद ही एका नव्या सिध्दांताच्या स्वरूपात समोर आला आहे. आधुनिक सिध्दांतकाराच्या मते मार्क्सचे सिध्दांत आजच्या आधुनिक समाजाच्या विश्लेषणासाठी उपयुक्त नाहीत. रूढीवादी अथवा स्थापीत मार्क्सचे सिध्दांत नुसार आजच्या आधुनिक कार्पोरेट भांडवलदाराचे विश्लेषण करता येणार नाही. नवमार्क्सवाद म्हणजे फ्रॅकफर्ट स्कूलची नवीन आवृत्ती फ्रॅकफर्ट स्कूलनेच नवमार्क्सवाद म्हणजे ज्यामध्ये कोणताही सामाजिक सिध्दांत अथवा विश्लेषणाला मार्क्स, फ्रडरिच व एजिंलसच्या विचारांना आपला मुळ संदर्भ बनवते म्हणजेच मार्क्सवादी विचाराचाच मुलाधार हा नव मार्क्सवादाचे वैशिष्ट्य ठरते.

जेफ्री अलेक्झेंडर यांनी आपल्या Neo – functionalism या ग्रंथात नवप्रकार्यवाद व नवमार्क्सवादी सिध्दांतात पूढील तीन समानता दाखवल्या आहेत.

Scanned with CamScanner